उप आयुक्त (सा.प्र.) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक.क्र.:- उआ(सा.प्र.)/आस्था/2090
दिनांक :- 10/08/2016

-: कार्यालय परिपत्रक :-

**विषय :-** निलंबन आढावा समितीची बैठक आयोजित करणेसाठी पुणे महानगरपालिकेतील विविध खात्यातून निलंबित असणाऱ्या सेवकांची माहिती विहित नमुन्यात पाठविणेबाबत.

**संदर्भ :-** कार्यालय परिपत्रक जा.क्र.मआ/उआ/से/४३६४, दि.१०/०१/२०१२.

पुणे महानगरपालिकेच्या सेवेतून निलंबित झालेल्या सेवक/अधिकारी यांचे निलंबनाचा आढावा घेणे कामी समिती स्थापन करण्यात आली असून समितीचे कामकाजाबाबत मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आली आहेत. त्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेतील निलंबित असणाऱ्या सेवक/अधिकाऱ्यांचा निलंबनाचा आढावा घेणेसाठी निलंबन आढावा समितीची बैठक आयोजित करावयाची आहे.

फौजदारी गुन्हा दाखल झालेल्या प्रकरणात न्यायालयात दोषारोप पत्र/अभियोग दाखल झाल्यानंतर २ वर्षाच्या कालावधीत प्रकरणाचा निकाल लागला नसेल तर अशा प्रकरणी निलंबन संपुष्टात आणून अकार्यकारी पदावर नियुक्ती देण्याची शिफारस निलंबन आढावा समिती करू शकते त्याचप्रमाणे ज्या ठिकाणी न्यायालयात दोषारोप पत्र/अभियोग दाखल होऊन २ वर्षाचा कालावधी झालेला नसेल किंवा दोषारोप पत्र/अभियोग दाखल झालेला नसेल अशा प्रकरणी निलंबन आढावा समितीने खालील बाबी विचारात घेऊन उचित शिफारस करण्याची तरतूद संदर्भांकित कार्यालय परिपत्रकामध्ये नमूद आहे.

१) विभागीय चौकशांतील/न्यायालयात दाखल झालेल्या दोषारोपपत्रातील दोषारोपांचे गांभीर्य, स्वरूप व व्याप्ती तसेच, तो सिध्द झाल्यास होऊ शकणारी कमाल शिक्षा.
२) निलंबनाचा कालावधी.
३) फौजदारी गुन्हयाच्या संदर्भात सक्षम न्यायालयात अभियोग दाखल करण्याच्या प्रक्रियेची सद्यःस्थिती
४) संबंधिताविरूध्द चालू असलेली विभागीय चौकशी/न्यायालयीन कार्यवाही/दोषारोप पत्र सादर करण्याच्या कार्यवाहीत विलंबास संबंधित अपचारी जबाबदार आहे किंवा कसे?
५) संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांचा त्यापुर्वीचा सेवा तपशिल व संबंधित मा.खातेप्रमुख यांचे मत.
६) संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांस अदा करण्यात येणाऱ्या निर्वाह भत्याची टक्केवारी व रक्कम.

त्या अनुषंगाने निलंबन आढावा समिती समोर सादर करण्यात येणाऱ्या प्रकरणांबाबत निर्णय घेवून उचित शिफारस करणेसाठी संबंधित दोषी सेवक/अधिकारी यांचेबाबत वरील मुद्दयाबाबतची माहिती आवश्यक आहे.

तरी ज्या प्रकरणी म.न.पा. अधिकारी/कर्मचाऱ्यांवर बेहिशेबी मालमत्ता, नैतिक अधःपतन, लाचलुचपत खून, खूनाचा प्रयत्न करणे, बलात्कार या व यासारख्या गंभीर प्रकरणात फौजदारी गुन्हा दाखल झाल्यामुळे निंलबनाची कारवाई करण्यात आली असेल अशा प्रकरणी निलंबनाच्या दिनांकापासून एक वर्षानंतर प्रकरण निलंबन आढावा समितीसमोर सादर करण्याची तरतूद संदर्भांकित कार्यालय परिपत्रकामध्ये आहे. त्या अनुषंगाने संबंधित खातेप्रमुख यांनी वर नमूद केलेल्या मुद्दा क्र.१ बाबत विधी विभागाचा अभिप्राय घेण्यात

यावा आणि मुद्दा क्र.२ ते ६ बाबतची माहिती नमूद करून संबंधित निलंबित सेवक/अधिकारी यांचे बाबतचे प्रस्ताव दि.११/०८/२०१७ अखेर आस्थापना विभागाकडे सादर करावेत.

संदर्भांकित कार्यालय परिपत्रकामध्ये विहित केलेली कार्यपध्दती व उपरोक्त १ ते ६ मध्ये नमूद माहितीसह प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि) यांचे अध्यक्षते खाली निलंबन आढावा समितीची बैठक आयोजित करण्याची कार्यवाही अलाहिदा केली जाईल.

तरी सदर कार्यालय परिपत्रकाची नोंद घेवून जरूर ती पुढील कार्यवाही विहित मुदतीत करावी ही विनंती.

उप आयुक्त (सा.प्र.)
पुणे महानगरपालिका

प्रतः-

१) मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि)
२) मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
३) मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ)
पुणे महानगरपालिका

यांजकडेस माहितीसाठी....

४) मा.खातेप्रमुख/उप आयुक्त (वि.क्र.कं.१ ते ४)/महा.सहा.आयुक्त(क्षेत्रिय कार्यालय)
पुणे महानगरपालिका

यांजकडेस जरूर त्या पुढील कार्यवाहीसाठी...